आर.सी.सी.८२२/२०२२
निशाणी क्र – ३९.

दोषारोप निश्चीती पुर्व पुरावा
फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्रं.१.ची साक्ष
देवा शपथ खरे सांगेण की,

नाव : सरोज भिमशा कोरे,
वय : ४४ वर्षे, धंदा : व्यवसाय,
राहणार : मोहमंदवाडी, पुणे.

**सरतपास शपथेवर फिर्यादीतर्फे वकील श्री एन.जी.कवडे :-**

मी सं.क्र.५६/९/२ वर या ठिकाणी माझ्या परिवासह राहते. मागील दहा वर्षापुर्वी माझ्या पतीचा अपघात झाला व त्यामध्ये त्यांना अपंगत्व आले व ते काहीही काम धंदा करीत नाही. मी मिळेल काम करुन व टेम्पो चालवून माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करते. मी सं.क्र.५६/९/२ येथे स्वतः कमाईतून नोंदणीकृत खरेदी खताद्वारे एक गुंठा जमीन खरेदी केली व त्या मिळकतीवर स्वतःखर्चाने दहा बाय तेरा दोन पक्या खोल्या व पाच पत्र्यांच्या खोल्या इत्यादी बांधकाम केल्या. त्या सर्व खोल्या मी भाडेत्ववावर दिल्या व त्यामधून मला वार्षिक सरासरी रुपये एक लाख नव्वद हजार इतके उत्पन्न मिळते. मला त्या मिळकतीचे विकसन करुन बांधकाम करायचे होते. त्यासाठी मी परिचित लोकांकडे बोलणी केली होती. त्यामधून माझी आरोपीसोबत ओळख झाली व त्यानंतर माझे त्यांच्याशी बोलणे झाले. आमच्यामध्ये विकसनाच्या संदर्भात काही अटी व शर्ती ठरल्या व विकसन करारनामा करण्याचे ठरले. दि.१९.०७.२०१५ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय हवेली २३ येथे दस्त क्र.५७९०/२०१५ नोंद झाला. त्याच दिवशी आरोपीने कधीही रदद न होणारे कुलमुख्यतार पत्र नोंदवण्यास सांगितले. आरोपीने माझा विश्वास संपादन केला व मी कुलमुख्यातार पत्र नोंदवण्यास तयार झाले. आरोपी मला त्यांच्या खर्चाने माझी मिळकत खर्च करुन देणार व दोघांचा भाग निम्मा निम्मा असेल असे ठरले. जो पर्यत मला बांधकाम करुन देणार तो पर्यत आरोपी उदरनिर्वाहासाठी दरमहा रुपये पाच हजार देईल असे ठरले. आरोपीने मला रुपये पाच हजार व रुपये चार हजार पाचशे चे दोन धनादेश दिले. परंतू बॅकेतून न वटता परत आले. मी आरोपीला जाब विचारण्यासाठी माझ्या मिळकतीमध्य गेले. तेथे मला वेगळेच निर्देशनाला आले. आरोपीने बांधकामासाठी निकृष्ठ दर्जाचे साहित्य वापरले आहे व वापरत आहे. आरोपीने माझी फसवणूक केली आहे व माझे न भरुन येणार नुकसान केले आहे. मी आरोपीला करारपत्राप्रमाणे सांगितले.

परंतु आरोपीने त्याकडे दुर्लक्ष केले. मी आरोपीकडे बांधकाम परवाना व नकाशाची मागणी केली. परंतु आरोपीने त्यांची पुर्तेता केली नाही. मी आरोपीविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रारी दिल्या. आरोपीने त्यावर उत्तर दिले नाही. आरोपीने विनायक मिरजकर नावाचा सुपरवाईझर नेमला होता. आरोपीने मला येण्यास मनाई केली व जातीवाचक शिवीगाळ केली. आरोपी मला ये चांभरडे आमचे कामात ढवळाढवळ करु नका असे म्हणाला. तसेच धमकी दिली की, तु साईटवर आलीस तर तुझ्या पांगळया पतीला जिवानिशी मारु. तसेच माझ्या मुलीसोबत बरे वाईट झाल्यास मी जबाबदार राहिले असे म्हणाला. माझे जिवाला धोका असल्याबाबत मी पोलीस स्टेशन कोंढवा येथे पत्र दिले. परंतु पोलीसांनी कोणतीही कारवाई केली नाही. मी साईटवर जावून कूलूप लावले व काम थांबविले. तसेच त्यांच्याकडे परवाने व मंजूर नकाशे मागितले. परंतु त्यांनी ते दिले नाही व काय करायचे ते करा असे म्हणाले. आरोपी क्र.२ मानसिक त्रास दयायला लागला. सबब मी प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे. मी दि.१२.१२.२०१९ दोन एनसी दिल्या व त्या दाखल केल्या आहेत. तसेच एफआयआरची प्रत मला झालेल्या दुखापतीचे कागदपत्र दाखल केलेले आहे. खरेदी खताचा मुळ दस्ताची प्रत दाखल केली आहे. आरोपीविरुध्द अन्य ठिकाणी केस असल्याबददल पुरावे दाखल केले आहे.

**सरतपास पुर्ण.**

उलटतपास आरोपी क्र.१ व २ तर्फे राखीव ठेवण्यात येतो.

समक्ष,

सही/-

दिनांक : ३१/०८/२०२४.

(अ.अ.कुलकर्णी)
२रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.